# प्रास्ताविक

देशभक्त पद्मश्री डॉ.रत्नाप्पाण्णा कुंभार यांचे कार्य अष्टपैलू आहे. ते एक थोर स्वातंत्र्यसेनानी आहेत. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली कोल्हापूर संस्थानातील प्रजापरिषदेची चळवळ जोमाने चालू होती व कोल्हापूर संस्थान आणि इतर दक्षिण महाराष्ट्रातील संस्थाने भारतीय संघराज्यात सामील होण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. श्री रत्नाप्पाण्णा कुंभार हे कुशल संघटक व महात्मा गांधीचे सच्चे अनुयायी आहेत. त्यांनी सन १९४२ च्या चलेजाव चळवळीत हिरीरीने भाग घेतला होता. ते सरदार वल्लभभाई पटेल, पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या माहितीतील असल्याने इ.स.१९५० ते १९५२ पर्यन्त खासदार म्हणून राहिले.

भारत स्वतंत्र झाल्यापासून ते आज अखेर रत्नाप्पाण्णा कुंभार हे एक सार्वजनिक कार्यकर्ते आहेत. आण्णांनी आमदार, खासदार, महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री,कॉंग्रेस पक्षाचे पदाधिकारी या सारख्या महत्वाच्या पदावरून लोकसेवा केली व आजही करीत आहेत. सहकार क्षेत्रात तर त्याचे कार्य अजोड असे आहे. पंचगंगा व कोल्हापूरच्या परिसरात अनेक सहकारी संस्था स्थापन करून सर्वसामान्यांची जनसेवा केलेली आहे.

अशा थोर स्वातंत्र्य सेनानी,कुशल संघटक,कॉंग्रेसचा निष्ठावंत पाईक, सहकार महर्षी यांच्या जीवनाचा व कार्याचा अभ्यास करण्याचा मी या ठिकाणी प्रामाणिक प्रयत्न करीत आहे. सदरचा अभ्यास करीत असताना सर्व उपलब्ध मूळ कागदपत्रांचा अभ्यास करून रत्नाप्पाण्णा कुंभार यांचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील व सहकार क्षेत्रातील त्यांचे कार्य किती मोठे आहे हे दाखवण्याचा प्रयत्न केलेला आहे. याप्रमाणेच शेती,उद्योग व मंत्री म्हणून या क्षेत्रातील त्याचे कार्य चिरस्मरणीय असून आज या वयाच्या ८३व्या वर्षी त्यांच्या कार्याची उमेद कायम आहे. तसेच आजच्या नवीन पिढीला अत्यंत मार्गदर्शक असे त्यांचे कार्य आहे.

या प्रबन्धाचे काम करीत असताना मला अनेक लोकांचे सहकार्य व प्रोत्साहन मिळाले. सुरुवातीस मी मा.रत्नाप्पाण्णा कुंभार यांची अतिशय ऋणी आहे.

कारण त्यांनी त्यांच्या कार्यावर काम करण्यास परवानगी दिली व इतर सहकार्य दिले.

त्याचप्रमाणे माझे मार्गदर्शक डॉ.बी.डी.खणे यांचे वेळोवेळी मार्गदर्शन झाले व सर्व प्रकरणे त्यांनी वेळेत तपासून दिली म्हणून हा प्रबंध विद्यापीठात योग्य वेळी सादर करू शकले म्हणून मी त्यांची शतशः ऋणी आहे. त्याच बरोबर इतिहास विभाग प्रमुख डॉ.बी.आर. कांबळे यांनी मला सहकार्य व प्रोत्साहन दिले त्यांचीही मी आभारी आहे.

शिव-शाहू महाविद्यालय, सरूड या संस्थेचे अध्यक्ष आमदार बाबासाहेब पाटील, सहचिटणीस गणपतराव थोरात कॉलेजचे प्रभारी प्राचार्य तांबोळी सर यांची प्रेरणा व सहाय्य अनमोल आहे. तसेच माझे सहकारी मित्र प्रा. सौ. व्ही.एम. देशमुख, प्रा.ए.पी.देसाई, प्रा.पी.बी.पाटील, प्रा.जी.बी.पाटील, प्रा.सोनाळकर, प्रा. जी.एच.कांबळे, प्रा.एस.एम.पाटील, प्रा.कु.मंदाकिनी पाटील, प्रा.सौ.एन.आर. पाटील, व इतर सर्व प्राध्यापक, ग्रंथपाल सौ. थिटे, तानाजी पाटील व सहाय्यक यांनी वेळोवेळी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मदत केली या बद्दल मी त्यांची आभारी आहे.

तसेच डॉ.शहाजीराव देशमुख, डॉ.पी.ए.कोळी व सौ.पी.पी.कोळी, यांनी सातत्याने मदत करून माझ्या कार्याला हातभार लावला, त्यामुळे त्यांचीही यामध्ये सिंहाचा वाटा आहे. मी त्यांची ऋणी आहे.

या शोध-निबंधास कुमार कोठावळे, नारायण कुपेकर, प्रा.भैरव कुंभार यांनीही महत्वाची कागदपत्रे मिळवून देण्यात मोलाचे साहाय्य केले आहे त्यांचीही मी आभारी आहे.

शिवाजी विद्यापीठाचे बॅ.खर्डेकर ग्रंथालय, शाहू संशोधन केन्द्र, कोल्हापूरचे रेकॉर्ड ऑफिस, गोखले इन्स्टिट्यूट, पुणे यांची खूप मदत झाली त्याचे व कर्मचा-यांचे आभार मानणे अत्यंत गरजेचे वाटते.

या कामाची पूर्तता त्वरित करावी यासाठी माझे आई-वडिल ,भाऊ, बहिणी, वहिनी व नातेवाईक यांनी वेळोवेळी केलेल्या सहाय्याबद्दल मी सर्वांची ऋणी आहे.

संदिप पचिंद्रे व रणजीत अडसिरे, दिनकरराव पचिन्द्रे यांनी केलेले सहाय्य तर नगण्यच आहे, त्यामुळे मी त्यांची सदैव ऋणी आहे.

श्रीयुत बाळकृष्ण रा.सावन्त यांनी वेळेत टंकलेखन करून दिल्याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

कोल्हापूर :　　　　　　　　　　प्रा.कु.अडिसरे एस.डी.

दिनांक ३०-११-१९९१.